# *महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

## **निवेदन**

विषय:-कौशल्य सेतू मधील व्यवसाय विषयाचा अभ्यासक्रम यशस्वी पणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणेबाबत.. ..

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त सर्व शाळाप्रमुखांना या निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, "कौशल्य सेतू" मधील व्यवसाय विषयाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणेसाठी शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018 /प्र.क्र.135/एस.डी.2,दि.27 सप्टेंबर 2018 निर्गमित करण्यात आला आहे.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2018-19 पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या माध्यमिक शाळांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाच्या पात्र विद्यार्थ्यांना इ.10 वी प्रमाणपत्र परीक्षेकरीता ट्रान्सफर ऑफ क्रेडीट्सचा लाभ देणेसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

1. इ.10 वी प्रमाणपत्र परीक्षेकरीता ट्रान्सफर ऑफ क्रेडीट्सचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी इ.10 वी च्या परीक्षेला प्रविष्ठ झालेल्या माध्यमिक शाळेमार्फत राज्य मंडळाने विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करुन नोंदणी करावयाची आहे. सदर विहीत नमुना मंडळाच्या **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर डाऊनलोड करुन प्रिंट काढण्यासाठी उपलब्ध आहे.
2. शैक्षणिक वर्ष 2018-19 पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांनी सदर अर्जाची प्रिंट काढून तो दि.19/10/18 ते दि.05/11/18 या कालावधीत परीपूर्ण व बिनचूक भरावा. सदर अर्जावर विहीत जागेवर स्वत:ची स्वाक्षरी करावी. तसेच तो ज्या माध्यमिक शाळेतून अंतिमत: माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला (इ.10 वी ) प्रविष्ठ झाला आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांची सही व शिक्का घेऊन सदर अर्ज संबंधित विभागीय मंडळात जमा करावा.
3. सदर अर्जासोबत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) सर्व परीक्षांचे गुणपत्रक व पी.एम.के.व्ही.वाय (कौशल्य सेतू अभियान) प्रमाणपत्र इ. च्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे संबंधित मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी मूळ कागदपत्रावरुन पडताळणी करुन स्वाक्षरीसह प्रमाणित करणे आवश्यक आहे.
4. उपरोक्त अर्ज विभागीय मंडळात जमा करताना त्यासोबत प्रक्रिया शुल्क (प्रोसेसिंग फी) – रू 40/-व गुणपत्रिका शुल्क रु. 10/- असे एकूण रु.50/- शुल्क राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) /रोखीने विभागीय मंडळात जमा करावेत. धनाक र्ष विभागीय सचिव,कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर यांचे नावे काढण्यात यावा.
5. उपरोक्त प्रमाणे शाळांनी सदरचे अर्ज दि.22/10/18 ते दि.07/11/18 या कालावधीत संबंधित विभागीय मंडळात जमा करावेत.
6. या विद्यार्थ्यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कौशल्य सेतू अभ्यासक्रमाच्या एका कोर्स साठी दोन विषयांचे या प्रमाणे विद्यार्थ्यांच्या मागणी नुसार देय असलेल्या एक किंवा दोन विषयांसाठी (दोन भाषा व श्रेणी विषय वगळून) ट्रान्सफर ऑफ क्रेडीट्स देण्यात येतील. मात्र सदर ट्रान्सफर ऑफ क्रेडीट्स माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला (इ.10 वी ) कोणत्या दोन विषयांसाठी (देय असलेल्या) घ्यावयाचे आहे याची निश्चिती विहीत नमुन्यातील अर्जात विद्यार्थ्यांनी नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर या मध्ये कोणताही बदल करता येणार नाही.
7. प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार मंडळामार्फत गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येतील.
8. उपरोक्त प्रमाणे ) ट्रान्सफर ऑफ क्रेडीट्स दिल्यानंतरही विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास तो उर्वरीत विषयासाठी पुनर्परिक्षार्थी म्हणून प्रविष्ठ होऊ शकेल.
9. ट्रान्सफर ऑफ क्रेडीट्स घेऊन विद्यार्थी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला (इ.10 वी ) उत्तीर्ण झाल्यास पुन्हा मंडळाच्या सदर परीक्षेला नियमित अथवा पुनर्परिक्षार्थी म्हणून प्रविष्ठ हाऊ शकणार नाही.

तरी शैक्षणिक वर्ष 2018 -19 पूर्वी कौशल्स सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांनी शासन निर्णयातील तरतूदींचा लाभ घेण्यासाठी उपरोक्तप्रमाणे विहित कार्यपध्दतीनुसार अर्ज करावेत. व संबंधित माध्यमिक शाळांनी सदर प्रकरणी वेळेत कार्यवाही करुन सहकार्य करावे.

दिनांक :-23/10/2018

विभागीय सचिव (प्र.)
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर